पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ८८९ दिनांक - १९/१२/२०२३**

कोंढवा पोलिस स्टेशन पुणे शहर

## नवीन वर्षाच्या पार्श्वभुमीवर कोंढवा पोलीस ठाणे तपासपथकाची दमदार कामगिरी (रेकार्डवरिल सराईत गुन्हेगाराकडुन ७ अवैध पिस्टल व २४ जिवंत काडतुसे केली जप्त)

मा.पोलीस आयुक्त पुणे शहर यांनी पुणे शहरात बेकाशयदेशीरपणे अग्नीशस्त्र जवळ बाळगणा-या इसमांचा व आरोपीचां शोध घेवुन कारवाई करण्याबाबत आदेशित केले होते. त्याप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष सोनवणे, पोलीस निरीक्षक गुन्हे संदिप भोसले, संजय मोगले यांनी कोंढवा पोलीस ठाणे कडील तपास पथकाला सुचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे तपास पथक अधिकारी सपोनि दिनेश पाटील, व तपास पथकातील स्टाफ असे कोबिंग ऑपरेशन दरम्यान रेकार्ड वरिल आरोपी चेक करुन त्याची झडती घेवुन तसेच गुप्त बातमीदाराच्या मार्फतीने अग्नीशस्त्राबाबत माहिती काढत होते.

वरिलप्रमाणे शोध घेत असताना तपास पथकातील अंमलदार विशाल मेमाणे यांना त्याच्या खब-याकडुन बातमी मिळाली की, बोपदेव घाटाच्या पायथ्याला गारवा हॉटेल जवळ एक इसम त्याच्या साथीदारासह काही दिवसापासुन येत असुन ते गुन्हेगार आहेत ते त्यांच्या कमरेला पिस्टल लावुन फिरत असतात. व ते दि.१४/१२/२०२३ रोजी सायंकाळच्या सुमारास पुन्हा बोपदेव घाटात गारवा हॉटेलच्या जवळ येणार आहे अशी माहिती मिळाली. त्याप्रमाणे तपास पथकातील स्टाफ यांच्या दोन टिम करुन गारवा हॉटेलच्या येथे थांबले. मिळालेल्या बातमीप्रमाणे दोन इसम वडाफच्या गाडीतुन उतरुन गारवा हॉटेलच्या दिशेन जावु लागले. बातमीदाराने सदर इसम हे तेच असल्याचे इशारा करुन सुचित केले असता त्यांना स्टाफच्या मदतीने पकडुन ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारता त्यांनी **१)संदेश उर्फ संजय अंकुश जाधव,वय ३२ वर्षे,रा.गोकुळ हौसींग सोसायटी,आंगणवाडी चौक शेजारी मोरे वस्ती चिखली २)शिवाजी उर्फ शिवा भाऊ कुडेकर,वय ३४ वर्षे रा.मु.पो.वाशेरे,ता.खेड जि.पुणे** असे असल्याचे सांगीतले.त्यावेळी त्यांची अंगझडती घेतली असता त्याच्या कमरेला प्रत्येकी एक पिस्टल व एकाच्या पॅन्टच्या खिशात ३ व एकाच्या खिशात २ जिंवत काडतुसे मिळुन आली आहे. त्यांच्याकडे अग्नीशस्त्राच्या परवान्याबाबत तसेच त्याच्याकडे अग्नीशस्त्र जवळ बाळगण्याचे कारण विचारले असता त्यांनी स्वरक्षणासाठी जवळ विनापरवाना जवळ बाळगले असल्याचे सांगितले. अ.क्र.०१ याच्यावर चिखली,देहुरोड,वडगाव मावळ,निगडी,भोसरी पोलीस ठाणे येथे दरोडयाचा प्रयत्न, घरफोडी,वाहन चोरी,तसेच बेकायदेशीर अग्नीशस्त्र जवळ बाळल्याबाबत एकुण ३२ गुन्हे व अ.क्र.०२ यांच्यावर खेड पोलीस ठाणे येथे खुन,जबरी चोरी व सरकारीकामात अडथळा केल्याबाबत एकुण ३ गुन्हे दाखल असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

सदर इसमाच्या विरुध्द बेकायदेशीर अग्नीशस्त्र जवळ बाळगल्याबाबत गुन्हा दाखल करुन अटक करण्यात आली असुन त्यांच्याकडे आधिक तपास करता शिवाजी उर्फ शिवा भाऊ कुडेकर यांच्या घरझडतीत लपवुन ठेवली आणखीन ३ अग्नीशस्त्र व ९ जिंवत काडतुसे मिळुन आली ती जप्त करण्यात आली आहे. त्यांनी अग्नीशस्त्र ही कोठुन आणली आहे याबाबत तपास केला असतांना त्यांनी मध्यप्रदेश मधील ओमंकार बर्नाला हयाच्याकडुन घेतल्याचे सांगितले.

त्याअनुषंगाने मध्यप्रदेश येथे जावुन ओमंकार बर्नाला याला पकडणे असल्याने त्यास अटक आरोपी यांच्या मार्फतीने संपर्क करुन आणखीन दोन अग्नीशस्त्र व १० जिवंत काडतुसाची मागणी केली.तेव्हा त्याने सदर अग्नीशस्त्र जि.जळगाव येथे घेवुन येतो असे सांगितले. तेव्हा त्यास पकडने करता कोंढवा तपास पथकातील स्टाफने सापळा रचला. ओमंकार बर्नाला हा स्वतः त्याचा हस्तक राहुल नानसिंग लिंगवाले याच्यासह नमुद ठिकाणी येवुन थोडया अंतरावर थांबुन हस्तकाकडे दोन अग्नीशस्त्र व १० जिवंत काडतुसे पाठवुन दिले.आम्ही हस्तकास ताब्यात घेवुन ओमंकार बर्नाला यास पकडण्या करिता गेलो असता तो मिळुन आला नाही हस्तक **राहुल लिंगवाले** याच्याकडे मिळुन आलेली अग्नीशस्त्र व काडतुसे जप्त करण्यात आली आहे. नमुद दाखल गुन्हयात अटक करण्यात आली आहे. वरिल तीनही आरोपी यांच्याकडुन एकुण **३,५०,०००/- रु.किंमतीची ७ अग्नीशस्त्र व १२,०००/- रु किंमतीची २४ जिवंत काडतुसे** जप्त करण्यात आली आहे. नमुद गुन्हयातील अटक आरोपी यांच्याकडे सहा पोलीस निरीक्षक दिनेशकुमार पाटील हे अधिक तपास करित आहेत.

वरील नमुद कारवाई ही मा.पोलीस आयुक्त पुणे शहर श्री.रितेश कुमार, मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग श्री.रंजनकुमार शर्मा,मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ ५ श्री.आर.राजा,मा.सहा.पोलीस आयुक्त,वानवडी विभाग श्री.शाहूराजे साळवे, मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक कोंढवा पोलीस स्टेशन,श्री.संतोष सोनवणे, मा.पोलीस निरीक्षक गुन्हे श्री.संदीप भोसले, मा.पोलीस निरीक्षक गुन्हे श्री.संजय मोगले,यांच्या मार्गदर्शनाखाली कोंढवा पोलीस स्टेशन येथील तपास पथकाचे सहा पोलीस निरीक्षक दिनेश पाटील,सहा पोलीस निरीक्षक लेखाजी शिंदे, पोलीस अमंलदार विशाल मेमाणे,सतिश चव्हाण,निलेश देसाई, लवेश शिंदे,शाहीद शेख,लक्ष्मण होळकर,संतोष बनसुडे,सुजित मदन,ज्ञानेश्वर भोसले,सुरज शुक्ला यांच्या पथकाने केली आहे.